Historicity Research Journal
Volume 1 | Issue 12 | Aug 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# डॉ.आंबेडकर आणि मराठवाडयातील भूमिहीनांचे आंदोलन

**प्रा. सरवदे सुशीलकुमार शंकरराव**

इतिहास विभाग प्रमुख, तेरणा महाविद्यालय,उस्मानाबाद.

**पार्श्वभूमी :-**

मराठवाडयातील ग्रामीण भागात शेतजमीन ही अधिकता उच्चवर्णीयांच्याच ताब्यात होती. दलित समाज हा भुमिहिन असल्यामुळे त्यांना इतरांच्या शेतीवर "शेतमजुर" म्हणुन राबावे लागे. निजामाने "--काही अस्पृश्यांना अटी टाकुन त्यांना मोफत जमीनी देण्याची तरतुद केली होती परंतु. शेती कसण्यासाठी त्यांच्याजवळ पैसा नसे म्हणुन जमीनदाराकडुन पैसे कर्जाऊ घेताना आपल्या जमीनी त्यांना गहाण ठेवाव्या लागे"[१] आणि पूढे आपोआपच त्या जमीनदारांना व्याजाच्या मोबदल्यात जमीनी गिळंकृत करता येत असत.

खरेतर असा कायदा होता की, "अस्पृश्याच्या इनाम जमीनी कोणी हिराऊन घेवु नये "--- १८२७ साला पासुन कोणाही वतनदाराला आपल्या वतनातील जमीन भाऊबंदाबाहेर कोणत्याही सबबीवर समर्पण करताच येत नव्हती, परंतु अशा कायद्याचा निर्बंध असुन ही अनेक महारांच्या वतनी जमिनी परक्याच्या ताब्यात गेल्या होत्या"[२] "महारांना जमिनी नाही याचे कारण त्या इतर लोकांनी घेतल्या"[३] आणि ज्यांच्याकडे काही प्रमाणात जमिनी अबादीत राहिल्या त्या मुळातच तुटपुंज्या असल्यामुळे तिच्यावर गुजरान करणे शक्यच नव्हते.

इ.स १९२९-३० चे सर्वेक्षण सांगते "औरंगाबाद या जिल्हयामध्येच एकुण जमिनीच्या ३०% जमीन हस्तांतरीत झाली त्यामुळे अनेक शेतकरी भूमिहीन झाले"[४] विशेष म्हणजे या "भूमिहीनापैकी अधिकतर लोक हे अस्पृश्यापैकीच होते"[५] त्यामुळे पुढील काळात भूमिहीनांचे आंदोलन डॉ.आंबेडकरांमुळे उभ राहिले. खेडयातील अस्पृश्याचे दुहेरी प्रश्न होते. पहिला म्हणजे सामाजिक आणि दुसरा आर्थिक, सामाजिक समतेसाठी बाबासाहेबांनी कायद्याची तरतुद केलीच होती परंतु आता आर्थिक प्रश्न सोडविणे महत्वाचे होते.

दि. १९ मार्च १९२७ सालीच महाड येथील भाषणात ते म्हणाले " शेती विकत घेणे हे अस्पृश्य लोकांना कदाचित कठीण जाईल पण जंगल खात्याच्या किती तरी पडीक जमीनी आहेत, त्यांना जर एखाद्या अस्पृश्य वर्गाच्या माणसाने मागणी केली तर त्याला त्या मिळण्यासाख्या आहेत"[६] इ.स. १९३० च्या "स्टार्ट समिती मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी ऐका शिफारशीत म्हटले" ----दाने तोडुन मिळालेली जमीन आणि वैरान पडील कजमीनी दलित वर्गीयांना द्याव्यात--"[७] अशीच मागणी त्यांनी १९४२ साली स्थापन झालेलया शेडयुल्ड कास्ट फेडरेशनतर्फे पुन्हा केली, परंतु सरकारने या मागणीची दखल घेतलेली दिसत नाही. म्हणून बाबासाहेबांनी १८ मार्च १९५५ च्या "आग्रा" येथील भाषणात म्हणले "----- खेडयापाडयातील अस्पृश्यांनी जेथे कोठे पडिक जमीन असेल ती ताब्यात घ्यावी."[८]

**मराठवाडयातील आंदोलन**

हैद्राबादी अधिकारी मराठवाडयातील अस्पृशावर वेगवेगळ्या मार्गाने जूलूम करीत. पूर्वी "अस्पृश्यांना कसण्यासाठी दिलेल्या जमीनी ते परत काढुन घेऊ लागले"[९] " खरे तर अस्पृश्यांच्या चळवळीचा जोर पाहुन १२ जानेवारी १९५३ रोजी" हैद्राबादी

सरकारने अस्पृश्यासाठी जमीन देण्याचे ठरविले होते त्या बद्दलचा निर्णय बाबासाहेबांना कळविण्याचे आश्वारसन हैद्राबादचे तत्कालिन अर्थमंत्री बिंदु यांनी दिल्ली बाबासाहेबांची भेट घेवुन दिले होत. त्या निर्णयाची प्रत लवकर पाठवा अशी बाबासाहेबांनी श्री बिदु यांना दिनांक ०६ नोव्हेंबर १९५३ ला पत्र पाठवुन विनंती केली."[१०] परंतु उत्तर काही आले नाही. डॉ.बाबासाहेबांनी हैद्राबाद सरकारच्या शेतकी मंत्र्याला २१ जुलै १९५३ रोजी औरंगाबाद येथे मुक्काम असताना पत्र लिहीले" मी औरंगाबादला आलो आहे माझ्या येथील मुक्कामात औरंगाबाद जिल्हयातील शेडयुल्ड कास्ट वर्गाचे लोक मजकडे रोज येत आहेत व आपल्या सरकार विरोधी तक्रारी मजकडे करीत आहेत ----- खुल्ताबाद येथील शेडयुल्ड कास्ट मंडळीने मजकडे अशी तक्रार नोंदविली. "सरकारने त्यांना कसण्यासाठी पडीक जमिनी दिल्या आहेत आणि त्या जमिनीत ते गेली काही वर्षापासुन योग्य ती मेहनत, मशागत करीत आहेत. अलीकडे खुल्ताबाद तालुका बदलुन औरंगाबाद जिल्हयात समाविष्ठ केला आहे ते या कसत असलेल्या जमीनी त्यांच्यापासुन काढुन घेवुन जंगल खाती जमा करण्यात आल्या आहेत त्याचा परिणाम असा झाला की त्या गरीब बिचाऱ्यांचे रोजच्या जीवनाचे चरितार्थाचे साधन एकदम नाहीसे झाले त्यामुळे त्यांना प्रत्यक्षात उपासमार करावी लागत आहे---"

बाबासाहेब पुढे पत्रात लिहीतात की "---मी आपणांस असे स्पष्टपणे म्हणेन की "सरकारच्या या हुकुमासाठी मागील धोरणाचा अर्थच मला समजु शकत नाही, जंगले ही आवश्यक असुन ती पाहीजेत. पण या करीता चरितार्थचे साधन म्हणुन असलेल्या जमीनी जंगल जमीनी वाढविण्यासाठी का बरे काढुन घ्याव्यात?----- दुसऱ्या अशा नापिक जमिनी पडुन आहेत त्या जंगले वाढविण्यासाठी घ्याव्यात सरकारने या दृष्टीने या बाबतीत विचार केलेला दिसत नाही--"[११]

"डॉ.बाबासाहेबांनी "श्री रामकृष्णराव मुख्य प्रधान हैद्राबाद सरकार यांना ही जुलै १९५३ मध्ये अशाच अर्थाचे पत्र लिहीले "[१२] परंतु त्यांचा काही उपयोग झाला नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या पत्राकडे दुर्लक्ष करुन सरकारने "जंगल व गवती कुरणे यांच्या रक्षणाच्या निमित्ताने अस्पृश्यांना दिलेल्या जमीनी परत घेतल्या" दि. ०९ ऑगस्ट १९५३ रोजी औरंगाबाद शेडयुल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्याकर्त्यापुढे बोलताना बाबासाहेब म्हणाले--" अस्पृयांकडुन सरकार जमिनी परत घेत असेल तर अर्ज विनंत्यावर विसंबुन न राहता हिंमतवान बना व उपासपोटी रहाण्यापेक्षा पडीक जमिनी परत मिळवा"[१३] बाबासाहेबांचा असा संदेश मिळताच भुमिहीनाच्या सत्याग्रहाची ठिणगी पडली. मोठया प्रमाणात लोक रस्त्यावर उतरले "मराठवाडा शेडयुल्ड कास्ट फेडरेशनने पाच ही जिल्हयात पडीक जमीनी ताब्यात घेण्याचा सत्याग्रह सुरु केला "[१४] "सत्याग्रहाचे प्रमुख नेते म्हणुन महाराष्ट्र शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष श्री दादासाहेब गायकवाड यांना अटक झाली"[१५] या सत्याग्रहात सुमारे १०,००० सत्याग्रहीनी भाग घेतला होता. ----बी.एस.मोरे, आर.जी.खंडाळे, श्री.खरात, श्री.सुरवसे इत्यांदीना सरकारने स्थानबध्द करुन ठेवले"[१६] औरंगाबाद जिल्यातील १७०० लोकांना (स्त्री-पुरुष) तुरुंगात टाकण्यात आले "[१७]

शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे सेक्रेटरी पा.ना.राजभोज यांनी मराठवाडयातील परिस्थिती पाहुन पत्रक काढले की, "अस्पृश्यांना सर्वस्वी नागविण्याचे हे सरकारी कारस्थान आहे. एकीकडे भूमीहिन अस्पृश्यांना जमिनी देण्याच्या घोषणा करावयाच्या व दुसरीकडे जंगलाच्या निमित्ताने जमिनीचा एखादा तुकटा असलेल्या अस्पृश्यांना भूमिहिन करावयाचे असे हे सरकारी वर्तन आहे. सत्याग्रही अतिशय शांतपणे या अरेरावीस विरोधत करीत आहेत"[१८]

सत्याग्रहीची तिव्रता चांगलीच वाढली. मराठवाडयाच्या बहुतेक जिल्हयातुन लोक या भूमिहिन आंदोलनात सामील झाले होते. हैद्राबादच्या राज्य सरकारच्या दलित नितीवर कोरडे ओढणारे हे आंदोलन होते" अस्पृश्यांना जमीनी परत देण्याचा निर्णय सरकारने घेतला तर मी त्यांना सत्यागृह बंद करण्यास सांगतो"[१९] असे एका वाक्यात बाबासाहेबांनी आपल्या पत्रात श्री बिंदु (शेतकी मंत्री) यांना लिहीले होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व श्री राजभोज यांनी हैद्राबादचे प्रधान श्री.बी.रामकृष्णन यांची दिल्लीत भेट घेतली. तेव्हा त्यांनी या प्रश्नात जातीने लक्ष घालण्याचे कबुल केले आणि शेवटी हजारो सत्याग्रही तुरुंगात गेल्यावर सरकार शहाणे झाले. हैद्राबाद सरकारने अस्पृश्यांच्या घेतलेल्या जमीनी इतक्यात राखीव जंगलाच्या सिमेवर देण्याचे हुकुम सोडले "[२०] ही सर्व स्थिती पाहुन बाबासाहेबांनी १६ नोव्हेंबर १९५३ रोजी सत्याग्रह बंद करण्याचे कार्यकर्त्यांना आदेश दिले.

**संदर्भ सुची**

१. बी.शामसुंदर, अध्यक्षिय भाषण, दलितवर्ग महासंघ हैद्राबाद परिषद (प्रथम) परभणी ३० मे १९४२.
२. मुन वसंत (संपा) "डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत व मुकनायकातील लेख" म. शासन, पृ-१८.

३. प्रभाकरराव हिंगोले षष्टयाव्दिपुर्ती समारंभ, स्मरणिका, नांदेड, दि. १५ मार्च १९८६, पृ ९
४. गोखले (प्रा) आर.एम.भारताचा आर्थिक इतिहास, भाग-१ कॉन्टीनेटल प्रका-पुणे १९७८, पृ. ५८.
५. उपरोक्त पृ-१०
६. गणवीर रत्नाकर, महाड समता संगर, रत्नमित्र प्रका भुसावळ- १९८१, पृ-७८
७. किर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर" पाप्युलर प्रका मुंबई, आवृत्ती-८ पृ१४३.
८. प्रबध्द भारत दि. २४ मार्च १९५६
९. खरात शंकरराव (संपा) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रे, इंद्रायणी प्र.क्र. १ पुणे- पृ-३३०.
१०. खैरमोडे चां.भ.,डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, खंड- ११ महाराष्ट्र राज्य सा.आणि स.मुंबई पृ- ७३-७४
११. खरात शंकरराव (सपा) पूर्वोक्त-पृ १३१-३२.
१२. खैरमोडे चां.भ. पूर्वोक्त खंड-११, पृ-७५
१३. आंबडेकर (डॉ) सविता, डॉ.आंबेडकरांच्या सहवासात तथागत प्रका.ठाणे, डॉ.आंबेडकर फाऊ मुंबई, पृ २०७
१४. खरात शंकरराव (सपा) पूर्वोक्त, खंड ११, पृ-३३०.
१५. लोखंडे एन.एस. व इतर (सपा) श्री.बापूसाहेब राजभोज जीवन व कार्ये, प्रका स्वा.समिती १९५६ पृ २६७
१६. खरात शंकरराव (संपा) पूर्वोक्त पृ ३३०
१७. खेरमोडे चां.भ. पूर्वोक्त, खंड ११ पृ-७४.
१८. लोखंडे एन.एस. व इतर (संपा) पूर्वोक्त पृ २६८
१९. खैरमोडे चां.भ. पूर्वोक्त खंड ११ पृ- ७४.
२०. लोखंडे चां.भ. पूर्वोक्त खंड ११ पृ-२६८.